08 AUG 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षेतील यशात विद्यापीठाचे योगदान

## विविध स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या भावना

कोल्हापूर : प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेतील आमच्या यशामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्राचे आणि ग्रंथालयाचे मोलाचे योगदान आहे, अशी कृतज्ञतेची भावना महाराष्ट्र राज्यसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या उमेदवारांनी व्यक्त केले. सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित करण्यात आला. त्यावेळी त्यांनी भावना व्यक्त केल्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह यशस्वी विद्यार्थी.

डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी प्रतीक लंबे, प्रिया काटकर, अजिंक्य इंगवले, सौरभ साळुंखे, प्रशांत शृंगारे, रजत खोपडे, धनश्री मौर्य, श्रीधर गुरव, स्नेहा मोरे यांनी यश मिळवले. त्यांचा गौरव करण्यात आला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धा परीक्षार्थींना कमीत कमी शुल्कात जास्तीत जास्त सुविधा देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. त्या प्रयत्नांचे फलित म्हणजे येथील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश होय. या उमेदवारांनी प्रशासकीय सेवेमध्ये काम हीच ओळख बनवावी आणि कुटुंबीयांचा, विद्यापीठाचा लौकिक उंचवावा.

केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अजित चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

0 8 AUG 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षेतील यशात विद्यापीठाचे योगदान

## 'एमपीएससी' परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या भावना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धा परीक्षेतील आमच्या यशामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्राचे व ग्रंथालयाचे मोलाचे योगदान आहे, अशी कृतज्ञतेची भावना राज्यसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या उमेदवारांनी व्यक्त केली.

२०२१-२२ व २०२२-२३ या दोन वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रतीक लंबे यांनी अत्यंत माफक शुल्कात विद्यापीठाने उपलब्ध केलेले मार्गदर्शन आणि ग्रंथालय सुविधा यांनी आपल्या यशात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगितले.



**कोल्हापूर : विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त करणाऱ्या शिवाजी विद्यापीठ केंद्राच्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रशासकीय सेवेमध्ये आपले काम हीच आपली ओळख बनवावी आणि आपल्यासह आपल्या कुटुंबीयांचा आणि विद्यापीठाचा लौकिक उंचवावा. केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह केंद्र सल्लागार समितीचे सदस्य आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

0 8 AUG 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘बेटी बचाओ’ शोधनिबंध संग्रह पथदर्शक

## कुलगुरू डॉ. शिर्के, शिवाजी विद्यापीठातर्फे शोधनिबंध ग्रंथरूपात संकलित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ‘बेटी बचाओ अभियानां’तर्गत प्रकाशित शोधनिबंधांचा संग्रह देशभरातील संशोधकांसह धोरणकर्त्यांसाठी पथदर्शक स्वरूपाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या ‘बेटी बचाओ अभियाना’तर्फे ‘गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र : इश्यूज अँड प्रॉस्पेक्टस्’ या विषयावर राज्यस्तरीय परिसंवादामध्ये महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांतीलही संशोधकांनी



कोल्हापूर : शोधनिबंध संग्रह ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी.

शोधनिबंध सादर केले होते. या शोधनिबंधांचे विद्यापीठातर्फे ग्रंथरूपात एकत्रित संकलन करण्यात आले. डॉ. प्रतिभा पवार यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ४७५ पृष्ठांच्या या ग्रंथामध्ये एकूण ४४ शोधनिबंध आहेत. त्यातील २६ इंग्रजी आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील संशोधकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे. यावेळी डॉ. भारती पाटील आणि प्रमुख डॉ. प्रतिभा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले, तर योजना पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. मीना पोतदार आदी उपस्थित होते.

0 8 AUG 2023 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शोधनिबंध संग्रह ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. भारती पाटील आदी.

# संशोधकांसाठी शोधनिबंध पथदर्शक

- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**
- **'बेटी बचाओ अभियाना''तर्फे शोधनिबंध संग्रहाचे प्रकाशन**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ अभियानां'तर्गत प्रकाशित करण्यात आलेला शोधनिबंधांचा संग्रह देशभरातील संशोधकांसह धोरणकर्त्यांसाठी पथदर्शक स्वरुपाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले.

विद्यापीठातील 'बेटी बचाओ अभियाना'तर्फे 'गर्ल चाइल्ड इन महाराष्ट्र: इश्यूज् अँन्ड प्रॉस्पेक्टस' या विषयावर राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादामध्ये महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांतील संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले होते. या शोधनिबंधांचे विद्यापीठातर्फे ग्रंथरुपात एकत्रित संकलन करण्यात आले. डॉ. प्रतिभा पवार यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले,. बेटी बचाओ अभियान हा आंतरविद्याशाखीय उपक्रम आहे. त्या माध्यमातून विद्यापीठासह महाविद्यालयीन स्तरावर होत असलेले जनजागृतीचे कार्य कौतुकास्पद आहे. महाविद्यालयांनी या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसमवेत जनजागृतीचे कार्य करण्यावर भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, या ग्रंथामध्ये एकूण ४४ शोधनिबंधांपैकी २६ इंग्रजी आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील संशोधकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे.

शारदाबाई पवार अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील आणि समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. योजना पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. जगन कराडे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. मीना पोतदार आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी



प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले. सोबत अन्य.

# शिष्यवृत्तीत 'भोगावती' प्रथम

**राशिवडे :** कुरुकली, ता. करवीर येथील भोगावती महाविद्यालयातील वाणिज्य विभागाला शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ग्रामीण विभागात गुणवत्तेचा प्रथम क्रमांक मिळाला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांना प्रथम क्रमांकाचे प्रशस्तिपत्र देण्यात आले. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. देशमुख डॉ. महाजन, डॉ. जाधव, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. एम. कांबळे, प्रबंधक अजित कांबळे उपस्थित होते. यासाठी संस्थेचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, सर्व संचालक, उपप्राचार्य प्रा. डॉ. एन. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

0 8 AUG 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासिकेच्या माध्यमातून सुविधा : विद्यापीठव्यतिरिक्त १६० विद्यार्थ्यांची सोय

# गरजूंना नाही झळ... विद्यापीठाचे स्पर्धा परीक्षेला बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्ञानार्जनाच्या माध्यमातून गेल्या ६१ वर्षांत लाखो बहुजन विद्यार्थ्यांचा उद्धार करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यांनाही बॅ. बाळासाहेब खर्डेकर अभ्यासिकेच्या माध्यमातून बळ दिले आहे. या अभ्यासिकेची ८०० विद्यार्थ्यांची क्षमता असून यातील १६० विद्यार्थी हे इतरत्र शिक्षण घेणारे आहेत. विद्यापीठाच्या आवारातील खासगी अभ्यासिकांचे अव्वाच्या सव्वा शुल्क सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडणारे नाही. यामुळे विद्यापीठाची ही अभ्यासिका कोल्हापुरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधार बनली आहे.



## बाहेरील विद्यार्थ्यांना कसा मिळतो प्रवेश

एमपीएससी-यूपीएससी करणारे ६०, नेट-सेट परीक्षेची तयारी करणारे ५०, सीए, सीएस, सीडब्लूएस करणाऱ्या ५० बाहेरील विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेत प्रवेश दिला जातो. यासाठी एमपीएससी-यूपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे परीक्षेचा फॉर्म, त्याचे शुल्क भरलेली पावती असणे बंधनकारक आहे. पदवी परीक्षेच्या गुणानुसार त्यांना येथे प्रवेश दिला जातो.

**८७८ रुपये शुल्क**

दोन मजली इमारतीत ही अभ्यासिका असून येथे प्रवेश घेतलेल्या बाहेरील विद्यार्थ्यांना सहा महिन्यांसाठी ८७८ रुपये शुल्क आकारले जाते. प्रत्येक वर्षी या शुल्कात दहा टक्क्यांनी वाढ होते. एका विद्यार्थ्याला सलग दुसऱ्यावेळी प्रवेश दिला जात नाही.



युवा पिढीला स्पर्धा परीक्षेची गोडी लागावी, यासाठी विद्यापीठाने ही सुविधा निर्माण केली आहे. याचा लाभ घेऊन अनेकांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

## कशी असते प्रवेश प्रक्रिया

विद्यापीठातील विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेत मोफत प्रवेश मिळतो. बाहेरील विद्यार्थ्यांसाठी सप्टेंबर ते फेब्रुवारी अशी सहा महिन्यांची एक तर मार्च ते ऑगस्ट अशी दुसरी बॅच असते. यासाठी १५ दिवस आधीच ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू होते.

## खर्डेकर ग्रंथालयातही विद्यार्थ्यांची सोय

बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातही विविध विभागांत ५४० विद्यार्थी अभ्यास करू शकतात अशी सोय आहे. विशेष म्हणजे स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी या ग्रंथालयाने गेल्या दीड वर्षात जवळपास दोन लाख रुपयांची पुस्तके खरेदी केली आहेत.

### काय आहेत सुविधा

मोफत वायफाय, शुद्ध पाणी, पुरेशी प्रकाश व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृह.

जनसंपर्क कक्ष
0 8 AUG 2023 पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदार नोंदणी, जागृती अभियान यशस्वी करा

## जिल्हाधिकारी : ९ ते १५ ऑगस्ट या क्रांती आठवड्यात मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यात ९ ते १५ ऑगस्टदरम्यान क्रांती आठवडा साजरा करण्यात येणार आहे. या आठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व 'एसएएएफ' या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने घरोघरी भेटी देऊन मतदार नोंदणी व जागृती अभियान राबविण्यात येणार आहे. ते यशस्वी करा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केले.

रेखावार म्हणाले, विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती, भावी मतदार म्हणून नावनोंदणी, मतदान व लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात जुलै २०२२ पासून ३१ शैक्षणिक संस्थांत निवडणूक साक्षरता मंच (ईएलसी) स्थापन केला आहे. या मंचचे नोडल अधिकारी म्हणून शिक्षकांची नियुक्ती केली आहे. कॅम्पस अम्बेसिडर म्हणून कॉलेजमधील एक विद्यार्थी व एका विद्यार्थिनीची नियुक्ती केली आहे. प्रत्येक शाळा, महाविद्यालयातून २० स्वयंसेवकांची निवड करण्यात आली आहे. अन्य शाळा, महाविद्यालये यांनीही अशा मंचची स्थापना करावी.

शहरातील सहा महाविद्यालयांच्या मतदार साक्षरता मंचांचे स्वयंसेवक विद्यार्थी या क्रांती आठवड्यात बीएलओ यांच्यासोबत घरोघरी भेटी देऊन मतदार नोंदणीच्या कामात साहाय्य करणार आहेत. या मंचाद्वारे मतदार जागृती, मतदार नोंदणी, अधिकाधिक नागरिकांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करण्याबरोबरच लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करण्यासारखे लोकशाहीभिमुख उपक्रम राबविण्यात येत असल्याचे रेखावार यांनी सांगितले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




**कोल्हापूर : मतदार साक्षरता मंचच्या स्वयंसेवकांसह जिल्हाधिकारी राहुल रेखावार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

क्रांतिसिंह

# आंतरविद्यापीठ स्पर्धेतील खेळाडूंचा सत्कार



कोल्हापूर(प्रतिनिधी):-चीनमधील चेंगडू येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या पाच क्रीडापटूंचा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना स्पर्धेतील यशस्वितेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. चीनमधील चेंगडू येथे होणाऱ्या जागतिक आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या पाच क्रीडापटूंची भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात जागतिक स्पर्धेसाठी पाच खेळाडूंची एकाच वेळी निवड होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. त्याबददल सदर क्रीडापटूंचा सत्कार आणि शुभेच्छा प्रदान कार्यक्रम शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू ओंकार कुंभार (नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स इचलकरंजी, ८०० मी. धावणे), सिध्दांत पुजारी (आजरा महाविद्यालय, आजरा, ३००० मी. स्टीपल चेस), ३. सुदेष्णा शिवणकर (यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सातारा, १०० मी. धावणे व ४ बाय १०० मी. रिले), रेश्मा केवटे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन) आणि राणी मुचंडी (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन) यांचा समावेश होता. तसेच, रिया नितीन पाटील हिने दक्षिण कोरिया येथे झालेल्या एशियन अंडर-२० ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप ४ बाय १०० रिले स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याबददल तिचाही कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. डी.बी. बिरनाळे, डॉ. धनंजय पाटील, श्रीमती स्मिता कुंभार, अभिषेक मस्कर उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षेत ७९८ गैरप्रकार

## ६४८ प्रकरणांचा निपटारा; समितीची कारवाई

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेंतर्गत ७९८ गैरप्रकरणे उघडकीस आली. परीक्षा प्रमाद समितीने कारवाई करून ६४८ प्रकरणांचा निपटारा केला आहे.



विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा सध्या व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) आदी अभ्यासक्रमांची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला २ हजार ६६७ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यामधून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. परीक्षेंतर्गत आजअखेर ७९८ गैरप्रकरणे आढळून आली आहेत. १२५ प्रकरणे अद्याप प्रलंबित असून, ती पुढील आठवड्यात मार्गी लागतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे आज विविध अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी (दि. ८) विविध अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या वतीने एमएस्सी. केमेस्ट्री (अॅनालिटिकल, फिजिकल, ऑर्गेनिक, इंडस्ट्रियल, अप्लाईड), एमएस्सी. बॉटनी, झूलॉजी, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर सायन्स, एन्व्हायर्मेंटल सायन्स, एमएस्सी. मायक्रोबायॉलॉजी, एमए., एमएस्सी. (भूगोल), एमएस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, बीएस्सी., एमएस्सी. (अर्थशास्त्र), बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, वायसीएसआरडी (एमबीए, एमएसडब्ल्यू, एम.टेक.) एमए (योगाशास्त्र) आदी अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षा सकाळी १० ते ५ यावेळेत होणार असल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ कौशल्य उद्योजकता विभागातर्फे महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात आले आहे.

नावीन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते; परंतु योग्य व्यासपीठ व मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

प्रथम टप्प्यात वरिष्ठ महाविद्यालये, पॉलिटेक्निक व आयटीआय यांची नोंदणी सुरू झाली आहे. नोंदणीसाठी www. msins. in AWdm https:// schemes. msins. in/ ला भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहअंतर्गत शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांचे व्याख्यान झाले. शेजारी डॉ. व्ही. एम. पाटील, रघुनाथ ढमकले, अरुंधती पवार आदी.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण संवादी हवे : डॉ. साळुंखे

कोल्हापूर, ता. ७ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण संवादी हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी येथे व्यक्त केले. न्यू कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी आणि आव्हाने' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते.

या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह अंतर्गत न्यू कॉलेजमध्ये व्याख्यान आयोजित केले होते. या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण हे विद्यार्थी केंद्रित बनले असून, ज्ञानार्जनासोबत कौशल्य व विकास सर्जनशीलतेवर भर देणे अपेक्षित आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक बाबतीत शासनाने सकारात्मक राहणे गरजेचे आहे, असे डॉ. साळुंखे यांनी सांगितले.

शैक्षणिक धोरणामुळे महाविद्यालयासमोर अनेक आव्हाने निर्माण झाले आहे. त्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांनी या बदलास सामोरे जाणे आवश्यक असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. न्यू कॉलेजचे अंतर्गत गुणवत्ता हमी सेलचे समन्वयक डॉ. निलेश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुंधती पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी आभार मानले.